## BOMBAY ACT No. III OF 1956.

## AN ACT TO AUTHORIZE, FACILITATE AND REGULATE THE CONSTRUCTION AND WORKING OF AERIAL ROPEWAYS IN THE STATE OF BOMBAY.

## सन १९५६ चा मुंबईचा अधिनियम ३ रा.

[ राष्ट्रपति यांची मंजुरी मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १९५६ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला. ]

**मुंबई राज्यांत हवाई रज्जुमार्ग बांधण्याचा आणि तो चालू ठेवण्याचा अधिकार देणें, तें सुलभ करणें व त्याचें नियमन करणें याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई राज्यांत हवाई रज्जुमार्ग बांधण्याचा व तो चालू ठेवण्याचा अधिकार देणें, तें सुलभ करणें व त्याचें नियमन करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी यावरून पुढें लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे :—

### बाब १.

### प्रारंभींचे ठराव.

१. (१) ह्या अधिनियमास सन १९५५ चा मुंबईचा हवाई रज्जुमार्गांबाबत अधिनियम असें म्हणावें. लहान सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

२. ह्या अधिनियमांत, विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(अ) "हवाई रज्जुमार्ग" या संज्ञेचा अर्थ, उतारू, जनावरें किंवा माल वाहून नेण्याच्या कारणाकरितां ज्यांवरून वाहनांचा उपयोग करण्यांत येतो त्या रज्जू अधांतरी बांधण्याची पद्धत असा समजावा आणि तींत, अशा हवाई रज्जुमार्गाच्या कारणांकरितां किंवा त्याच्या संबंधांत वापरलेले खांब, रज्जू, वाहनें, स्टेशन, कचेऱ्या, वखारी, वर्कशॉप, यंत्रसामुग्री व इतर कामें यांचा व अशा रज्जुमार्गास लागून असलेल्या सर्व जमिनीचा समावेश होतो;

(ब) "वाहन" या संज्ञेचा अर्थ, रज्जूनें टांगलेलें किंवा रज्जूवर लोंबकळणारें किंवा रज्जूनें ओढण्यांत येणारें आणि उतारू, जनावरें किंवा माल वाहून नेण्याकरितां किंवा रज्जुमार्ग चालू ठेवण्यासंबंधींच्या कोणत्याहि इतर कारणाकरितां उपयोगांत आणलेलें कोणतेंहि वाहन किंवा पात्र असा समजावा;

(क) "इन्स्पेक्टर" या संज्ञेचा अर्थ, कलम ४ अन्वयें नेमलेला हवाई-रज्जुमार्ग-इन्स्पेक्टर असा समजावा ;

(ड) "खांब" या संज्ञेचा अर्थ, रज्जु नेण्यासाठींचा, टांगण्यासाठींचा किंवा तिला आधार देण्यासाठींचा खांब, ट्रेसूल, उभा खांब, तुळई, आधार किंवा इतर साधन किंवा साधनाचा भाग असा समजावा;

(इ) "ठरविलेलें" म्हणजे ह्या अधिनियमाअन्वयें केलेल्या नियमांवरून ठरविलेलें असा समजावा;

(फ) "प्रवर्तक" या संज्ञेचा अर्थ, कलम १० अन्वयें किंवा कलम ३० अन्वयें ज्या इसमाच्या नांवें हुकूम करण्यांत आलेला असेल किंवा ह्या अधिनियमावरून किंवा ह्या अधिनियमाअन्वयें केलेले नियम व हुकूम यांवरून रज्जुमार्ग बांधणें, ते सुस्थितींत राखणें आणि त्यांचा वापर करणें याबाबतचे प्रवर्तकास दिलेले हक्क व त्याच्यावर लादलेल्या जबाबदाऱ्या कलम ४२ अन्वयें ज्या इसमास देण्यांत आले असतील किंवा ज्याच्यावर लादण्यांत आले असतील तो कोणताहि इसम असा समजावा; आणि तींत, कलम २७ अन्वयें ज्या इसमास पट्टा देण्यांत आला असेल अशा पट्टेदाराचा समावेश होतो;

(ग) "दर" ह्या संज्ञेंत, हवाई रज्जुमार्गावरून उतारू, जनावरें किंवा माल वाहून नेण्यासाठींचें कोणतेंहि भाडें, आकार किंवा दिलेली इतर रक्कम यांचा समावेश होतो;

(ह) "रज्जु" या संज्ञेंत, वाहन लोंबकळविण्यासाठीं, नेण्यासाठीं किंवा ओढण्यासाठीं वापरलेली, लवचिक किंवा न वाकणारी कोणतीहि जाड तार (केबल), तार, रूळ किंवा मार्ग यांचा,—जर अशी जाड तार, तार, रूळ किंवा मार्ग याचा कोणताहि भाग अधांतरीं नेला असेल आणि खांबापासून लोंबकळविला असेल किंवा खांबावर आधारलेला असेल तर,—समावेश होतो ;

(आय्) "नियम" ह्या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमाअन्वयें केलेले नियम असा समजावा;

(जे) "अंडरटेकिंग" या संज्ञेचा अर्थ, प्रवर्तकाची हवाई रज्जु-मार्गासाठीं योग्य असलेली व त्या कारणांसाठीं त्यानें वापरलेली सर्व जंगम किंवा स्थावर मालमिळकत असा समजावा.

## भाग २.

### सल्लागार मंडळ आणि स्थापना.

हवाई रज्जुमार्गासाठीं सल्लागार मंडळाची रचना करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

३. (१) राज्य सरकारनें, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, हवाई रज्जुमार्गासाठीं सल्लागार मंडळाची रचना केली पाहिजे.

(२) अशा मंडळांत जो राज्य सरकारचा चीफ इंजिनियर असेल असा राज्य सरकारनें नेमावयाचा चेअरमन, आणि राज्य सरकारनें तज्ज्ञ सदस्य म्हणून नेमावयाचे दोन इसम असतील.

(३) राज्य सरकारास, सामान्य किंवा खास हुकूम काढून,—

(अ) सल्लागार मंडळाची कर्तव्यें ठरविण्याचा आणि त्यांच्या काम चालविण्याच्या रीतीविषयींचें नियमन करण्याचा ;

(ब) मंडळाच्या सदस्यांच्या हुद्याची मुदत ठरविण्याचा ; आणि

(क) अशा मंडळाच्या कोणत्याहि सदस्यास फी देण्याबाबत आणि त्यानें त्याचें कर्तव्य बजावितांना केलेला प्रवासखर्च देण्याबाबत सूचना देण्याचा ;

अधिकार आहे.

इन्स्पेक्टर आणि दुय्यम अधिकारी आणि नोकर यांची नेमणूक व त्यांचे अधिकार व कर्तव्यें.

४. (१) राज्य सरकारास, हवाई रज्जुमार्गाचे इन्स्पेक्टर असण्यास त्यास योग्य वाटतील असे इसम नेमण्याचा अधिकार आहे.

(२) इन्स्पेक्टरनें, ह्या अधिनियमावरून किंवा ह्या अधिनियमाच्या ठरावाअन्वयें तरतूद करण्यांत येतील असे अधिकार चालविले पाहिजेत आणि कामें व कर्तव्यें केलीं पाहिजेत. अशा कोणत्याहि इन्स्पेक्टरनें वेळोवेळीं असे रज्जुमार्ग तपासणें, आणि ते योग्य स्थितींत ठेवले आहेत किंवा नाहींत, आणि ते वापरणारे इसम व सर्वसाधारण जनता यांची सोय व सुरक्षितपणा यांकडे योग्य लक्ष पुरवून आणि ह्या अधिनियमाच्या ठरावांस सुसंगत अशा रीतीनें चालवले जातात किंवा नाहींत हें ठरविणें हेंसुद्धां अशा इन्स्पेक्टरचें कर्तव्य असेल.

(३) राज्य सरकारास, ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याच्या कारणांकरितां आवश्यक असतील असे हुद्दे देऊन इतर दुय्यम अधिकारी व नोकर नेमण्याचा व त्यांस असे अधिकार, कर्तव्यें व कामें नेमून देण्याचा सुद्धां अधिकार आहे.

## बाब ३.

### सार्वजनिक वाहतुकीसाठीं हवाई रज्जुमार्ग.

### काम करण्याची रीत आणि प्रारंभींचा तपास.

*अनधिकृत-रीत्या हवाई रज्जुमार्ग बांधणें, ते सुस्थितींत ठेवणें, इत्यादींस मनाई.*

५. ह्या अधिनियमाच्या ठरावांस अनुसरून असेल तें खेरीजकरून कोणताहि रज्जुमार्ग बांधतां, सुरू करतां, सुस्थितींत ठेवतां किंवा चालू ठेवतां कामा नये.

*सवलतीसाठीं अर्ज.*

६. राज्य सरकार खेरीजकरून, प्रवर्तक होण्याचा इरादा असलेल्या इतर इसमानें नियोजित हवाई रज्जुमार्गासंबंधीं आवश्यक तो प्रारंभींचा तपास हातीं घेण्याची परवानगी मिळविण्यासाठींचा प्रत्येक अर्ज राज्य सरकारकडे सादर केला पाहिजे.

*अर्जांतील मजकूर.*

७. कलम ६ अन्वयें करावयाच्या प्रत्येक अर्जांत पुढील गोष्टी असल्या पाहिजेत :—

(अ) अंडरटेकिंगचें आणि नियोजित हवाई रज्जुमार्गासाठीं जो मार्ग अनुसरावयाचा त्या मार्गाचें वर्णन;

(ब) अशा हवाई रज्जुमार्गाच्या बांधणीच्या आणि त्याची व्यवस्था ठेवण्याच्या पद्धतीचें आणि त्यापासून समाजास जे फायदे होतील अशी अपेक्षा करण्यांत येते त्या फायद्यांचें वर्णन;

(क) त्याच्या बांधणीस येणाऱ्या खर्चाचा अंदाज;

(ड) तो चालू ठेवण्यास येणारा अंदाजें खर्च आणि त्याच्या संबंधांतील फायदे यांचें पत्रक;

(इ) आकारावयाचे योजलेल्या कमाल व किमान दरांचें पत्रक;

(फ) योजनेची कल्पना येण्यासाठीं राज्य सरकारास आवश्यक वाटतील असे त्या संबंधांतील नकाशे, प्लान, भाग आणि चित्रणें.

*प्रारंभिक तपास करण्यास मंजुरी.*

८. (१) ह्या अधिनियमाच्या आणि सन १८९४ चा जमीन घेण्याविषयीं अधिनियम याच्या ४ थ्या कलमाच्या ठरावांस पात्र राहून, राज्य सरकारास, प्रवर्तक होण्याचा इरादा असलेल्या इसमास, आवश्यक असेल अशी पहाणी करण्यास मंजुरी देण्याचा, आणि योजना पूर्णपणें विचारांत घेण्यासाठीं त्यास आवश्यक वाटतील असे तपशीलवार अंदाज, प्लान, भाग व वर्णनें आणि आणखी माहिती सादर करण्यास त्यास भाग पाडण्याचा अधिकार आहे.

(२) प्रवर्तक होण्याचा इरादा असलेल्या इसमास, त्याचा अर्ज नाकारल्याच्या प्रसंगीं, ह्या कलमाअन्वयें त्यास आलेल्या कोणत्याहि खर्चाबद्दल राज्य सरकारकडून कोणतीहि नुकसानभरपाई मागण्याचा हक्क असणार नाहीं.

## रज्जुमार्ग बांधण्याचा अधिकार देणारे हुकूम.

बांधणी करण्याचा अधिकार देणारा हुकूम व अशा हुकुमांतील मजकूर.

९. (१) राज्य सरकारास, प्रवर्तक होण्याचा इरादा असलेल्या कोणत्याहि इसमानें अर्ज केला असतां आणि ८ व्या कलमानुसार पुरविलेला तपशील योग्य रीतीनें विचारांत घेतल्यावर, अशा प्रवर्तकानें किंवा त्याच्या वतीनें, राज्य सरकारास योग्य वाटतील अशा निर्बंधांस व शर्तींस पात्र ठेवून, अशा हुकुमांत निर्दिष्ट केलल्या कोणत्याहि प्रदेशांत किंवा कोणत्याहि मार्गावर—

(अ) उतारूंच्या सार्वजनिक वाहतुकीसाठीं;

(ब) उतारू व माल यांच्या सार्वजनिक वाहतुकीसाठीं;

(क) जनावरें व माल यांच्या सार्वजनिक वाहतुकीसाठीं; किंवा

(ड) उतारू, जनावरें आणि माल यांच्या सार्वजनिक वाहतुकीसाठीं;

हवाई रज्जुमार्ग बांधण्याचा अधिकार देणाऱ्या नियोजित हुकुमाचा मसुदा राजपत्रांत प्रसिद्ध करण्याचा अधिकार आहे.

(२) हुकुमाच्या मसुद्यासोबत, नियोजित हुकुमासंबंधीं कोणत्याहि इसमास जी कोणतीहि हरकत घ्यावयाची किंवा सूचना करावयाची इच्छा असेल ती हरकत किंवा सूचना अशी नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आंत राज्य सरकारास सादर केली असतां राज्य सरकारकडून तिचा विचार करण्यांत येईल असें नमूद करणारी नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे.

(३) त्याचप्रमाणें, राज्य सरकारनें असा हुकूम करण्याच्या इराद्याची जाहीर नोटीस सदरहू प्रदेशांत किंवा सदरहू मार्गावर सोयीस्कर जागीं देवविली पाहिजे आणि सोयीस्कर रीतीनें शक्य होईल तेथवर, ज्या जमिनीवरून असा मार्ग जात असल त्या जमिनीच्या प्रत्येक मालकावर किंवा भोगवटा करणारावर तशीच एक नोटीस बजावविली पाहिजे आणि नियोजित हुकुमासंबंधीं जी कोणतीहि हरकत किंवा सूचना कोणत्याहि इसमाकडून नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या तारखेच्या आंत मिळेल ती विचारांत घेतली पाहिजे आणि तीवर निर्णय दिला पाहिजे.

(४) नियोजित हुकुमाच्या मसुद्यांत पुढील गोष्टी निर्दिष्ट केल्या पाहिजेत :—

(१) हवाई रज्जुमार्ग बांधण्यासाठीं आवश्यक असलेलें भांडवल ज्या मुदतीच्या आंत उभारण्यांत येईल ती मुदत;

(२) ज्या वेळेच्या आंत बांधकामास सुरवात होईल ती वेळ;

(३) ज्या वेळेच्या आंत बांधकाम पूर्ण करण्यांत येईल ती वेळ;

(४) राज्य सरकारकडून किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याकडून प्रवर्तकास ज्या शर्तींअन्वयें कोणतीहि सवलत देण्यांत येईल त्या शर्ती;

(५) कलम २४ च्या ठरावांस पात्र राहून, राज्य सरकारनें किंवा संबंधित स्थानिक प्राधिकाऱ्यानें खरेदी करण्याचे हक्क;

(६) बांधणीचा नमुना, सामानाचा दर्जा, सुरक्षिततेच्या गोष्टी, दाबाचे मोजमापन करण्याची पद्धत आणि आवश्यक वाटतील असे इतर तांत्रिक तपशील यासंबंधींच्या शर्ती;

(७) म्युनिसिपल हद्दींत पूर्णपणें नसलेले, संसदेनें केलेल्या कोणत्याहि कायद्यावरून किंवा कायद्याअन्वयें जे हमरस्ते राष्ट्रीय हमरस्ते म्हणून ठरविले आहेत किंवा ठरविण्यांत आले असतील ते हमरस्ते, रेल्वे आणि ट्राम्वे खेरीजकरून, दळणवळणाच्या सार्वजनिक रस्त्यावर आणि प्रसंगाप्रमाणें, मध्यवर्ती सरकार किंवा रेल्वे ॲडमिनिस्ट्रेशन यांची आगाऊ मंजुरी घेऊन अशा राष्ट्रीय हमरस्त्यांवर, रेल्वेवर आणि ट्राम्वेवर किंवा खाणकामाच्या मालमत्तेवर हवाई रज्जुमार्ग बांधण्यासंबंधींच्या शर्ती;

(८) ज्या शर्तींअन्वयें प्रवर्तकास त्याचे हक्क राज्य सरकारास किंवा स्थानिक प्राधिकाऱ्यास किंवा कोणत्याहि इतर इसमास विकतां किंवा तबदील करतां येतील त्या शर्ती;

(९) ज्या शर्तींअन्वयें हवाई रज्जुमार्ग स्वतः राज्य सरकारनें किंवा स्थानिक प्राधिकाऱ्यानें, किंवा प्रवर्तकाव्यतिरिक्त इतर इसमानें चालविण्यासाठीं राज्य सरकारला स्वतःकडे घेण्याचा अधिकार आहे त्या शर्ती;

(१०) हवाई रज्जुमार्गावर वापरण्यांत यावयाची चालक शक्ति व ती ज्या शर्तींवर, कांहीं असल्यास, वापरतां येईल त्या शर्ती;

(११) रज्जूच्या निरनिराळ्या भागांखालीं राखण्यांत आली पाहिजे अशी किमान उंची;

(१२) रज्जूखालील ज्या ठिकाणीं पूल किंवा रखवालीच्या जागा हीं बांधण्यांत व सुस्थितींत ठेवण्यांत आलीं पाहिजेत तीं ठिकाणें;

(१३) प्रवर्तकानें, त्याचा अर्ज मंजूर झाल्याच्या बाबतींत जी रक्कम, कोणतीहि असल्यास, तारण म्हणून अनामत ठेवावयाची ती रक्कम;

(१४) हवाई रज्जुमार्गावर जी वाहतूक करण्याचा अधिकार आहे ती वाहतूक, जी वाहतूक करण्यास प्रवर्तक बांधलेला आहे ती वाहतूक व जी वाहतूक करण्याचें नाकारण्याचा त्यास अधिकार आहे ती वाहतूक;

(१५) कलम १८ च्या ठरावांस पात्र राहून, प्रवर्तकास जे दर आकारण्याचा अधिकार आहे ते दर आणि हे दर ज्या परिस्थितींत व ज्या रीतीनें सुधारण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे ती परिस्थिति व ती रीत; आणि

(१६) राज्य सरकारास आवश्यक वाटतील अशा इतर बाबी.

**अखेरचा हुकूम.**

१०. (१) कलम ९, पोट-कलम (२) मध्यें निर्दिष्ट केलेली तीन महिन्यांची मुदत संपण्यापूर्वी मसुद्याच्या संबंधांत ज्या कोणत्याहि हरकती घेण्यांत किंवा सूचना करण्यांत आल्या असतील अशा कोणत्याहि हरकतींचा किंवा सूचनांचा विचार केल्यावर, जर राज्य सरकारचें असें मत असेल कीं, अर्ज, त्यांत फेरफार करुन किंवा केल्यावांचून किंवा कोणत्याहि निर्बंधास किंवा शर्तींस पात्र ठेवून संजूर करण्यांत यावा तर, त्यानें त्याप्रमाणें हुकूम केला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें केलेला हवाई रज्जुमार्ग बांधण्याचा अधिकार देणारा प्रत्येक हुकूम राजपत्रांत प्रसिद्ध केला पाहिजे, आणि असें प्रसिद्ध करणें हें, सदरहू हुकूम ह्या कलमावरून आवश्यक असल्याप्रमाणें करण्यांत आला आहे ह्याचा निर्णायक पुरावा असेल.

**कलम १० अन्वयेंच्या हुकुमावरून दिलेले अधिकार चालविण्याचें बंद होणें.**

११. जर, कलम १० अन्वयें केलेल्या हुकुमावरून हवाई रज्जुमार्ग बांधण्याचा अधिकार देण्यांत आलेला प्रवर्तक, हुकुमांत निर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आंत,—

(अ) असा रज्जुमार्ग बांधून पुरा करण्यास आवश्यक असलेल्या भांडवलाची पूर्ण रक्कम उभारण्यांत यशस्वी होणार नाहीं, किंवा

(ब) असा रज्जुमार्ग बांधण्याच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करणार नाहीं, किंवा

(क) त्याचें बांधकाम पूर्ण करणार नाहीं,

तर अशा हुकुमावरून प्रवर्तकास दिलेले अधिकार, राज्य सरकार अशा रीतीनें निर्दिष्ट केलेली मुदत वाढवील तें खेरीजकरुन, चालविण्याचें बंद होईल.

**उतारूंच्या वाहतुकीसाठीं हवाई रज्जुमार्ग सुरू करणें.**

१२. जेव्हां फक्त जनावरें व माल यांच्या सार्वजनिक वाहतुकीकरितां हवाई रज्जुमार्ग बांधण्याचा ह्या अधिनियमाअन्वयें अधिकार देण्यांत आलेला असेल तेव्हां, राज्य सरकारास, प्रवर्तकानें अर्ज केल्यावर, असा रज्जुमार्ग उतारूंच्याहि सार्वजनिक वाहतुकीसाठीं सुरू करण्यास संजुरी देण्याचा अधिकार आहे.

**प्रवर्तक आणि त्याचे नोकर इत्यादींनीं इन्स्पेक्टर व इतर अधिकारी यांस सवलती देणें.**

१३. प्रवर्तक, त्याचे नोकर, अभिकर्ते किंवा त्याच्या वतीनें काम करणारा कोणताहि इसम यानें, कलम ४ अन्वयें नेमलेल्या सर्व इन्स्पेक्टरांना आणि अधिकाऱ्यांना व नोकरांना, ह्या अधिनियमाच्या ठरावांअन्वयें व नियमांअन्वयें त्यांना दिलेले अधिकार चालविण्यासाठीं त्यांना दिलेली व त्यांच्यावर लादलेलीं कर्तव्यें व कामें पार पाडण्यासाठीं वाजवी सवलती दिल्या पाहिजेत.

## सार्वजनिक हवाई रज्जुमार्गाची तपासणी.

**हवाई रज्जमार्ग सुरू करण्यापूर्वी त्याची तपासणी करणें.**

१४. (१) राज्य सरकार किंवा राज्य सरकारनें ह्याबाबत अधिकार दिलेला इन्स्पेक्टर, हुकूम करून, कोणत्याहि प्रकारच्या वाहतुकीसाठीं हवाई रज्जुमार्ग सुरू करण्यास मंजुरी देईपर्यंत, कोणताहि हवाई रज्जुमार्ग त्या कारणाकरितां सुरू करतां कामा नये. हवाई रज्जुमार्ग सुरक्षित व कार्यक्षम रीतीनें चालू ठेवण्यासाठीं कलम ४५ अन्वयें योग्य रीतीनें नियम करण्यांत येईपर्यंत व इन्स्पेक्टरकडून हवाई रज्जुमार्गाची तपासणी केल्यानंतर पुढील गोष्टींचा राज्य सरकारकडे लेखी रिपोर्ट करण्यांत येईपर्यंत अशी मंजुरी देण्यांत येतां कामा नये. त्या गोष्टी पुढीलप्रमाणें :—

(अ) हवाई रज्जुमार्ग आणि त्यास लागून असलेल्या वस्तु यांची त्यानें काळजीपूर्वक तपासणी केली आहे ;

(ब) अस्थिर व स्थिर विस्तार व कलम ९, पोट-कलम (४) व कलम १०, पोट-कलम (१) अन्वयें ठरविलेल्या इतर शर्ती पाळण्यांत आल्या आहेत ;

(क) हवाई रज्जुमार्ग ज्या वाहतुकीसाठीं वापरण्याचा इरादा आहे त्या वाहतुकीसाठीं तो पुरेसा सुसज्ज आहे ;

(ड) हवाई रज्जुमार्ग हा, त्याच्या मतें, सार्वजनिक वाहतुकीसाठीं योग्य आहे आणि तो त्यावरून वाहून नेण्यांत येणारे इसम, जनावरें किंवा माल यांस, किंवा त्याच्या संबंधांत कामावर लावलेल्या इसमांस किंवा सर्वसाधारण जनतेस बिनधोक वापरतां येईल.

(२) पोट-कलम (१) चे ठराव, हवाई रज्जुमार्गाचे जादा विभाग सुरू करण्यास, आणि दुसरे फांटे आणि ज्या कोणत्याहि कामास पोट-कलम (१) चे ठराव लागू असतील किंवा ह्या पोट-कलमावरून लागू करण्यांत आले असतील त्या कोणत्याहि कामाच्या बांधकामाच्या स्वरूपांत महत्त्वाचा परिणाम घडवून आणणारा कोणताहि बदल किंवा पुनर्बांधणी यांस लागू होतील.

## सार्वजनिक वाहतुकीसाठीं हवाई रज्जुमार्ग बांधणें व ते सुस्थितींत ठेवणें याबाबत.

**सर्व आवश्यक कामें पार पाडण्याचा प्रवर्तकाचा अधिकार.**

१५. (१) ह्या अधिनियमाच्या ठरावांस व नियमांस, आणि प्रवर्तकाच्या मालकीच्या नसलेल्या स्थावर मालमिळकतीच्या बाबतींत सार्वजनिक कारणांसाठीं जमीन घेण्याबाबत त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या ठरावांस पात्र राहून, सार्वजनिक वाहतुकीसाठींच्या हवाई रज्जुमार्गाच्या प्रवर्तकास पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे :—

(अ) त्यास आवश्यक वाटेल असा सर्व्हे करणें ;

(ब) कोणत्याहि स्थावर मालमिळकतींत किंवा मालमिळकतीवर खांब उभारणें व ते सुस्थितींत राखणें ;

(क) कोणत्याहि स्थावर मालमिळकतीवरून, तिच्या बाजूनें किंवा तिच्या एका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत रज्जू लोंबकळविणें आणि ती सुस्थितींत ठेवणें;

(ड) आवश्यक असतील असे पूल, कल्व्हर्ट, नाली, बांध आणि रस्ते करणें;

(इ) आवश्यक असतील अशीं यंत्रें, कचेऱ्या, स्टेशनें, वखारी आणि इतर इमारती, कामें व सोयी उभारणें व बांधणें; आणि

(फ) हवाई रज्जुमार्ग बांधण्यासाठीं, ते सुस्थितींत राखण्यासाठीं, त्यांत बदल करण्यासाठीं, ते दुरुस्त करण्यासाठीं आणि वापरण्यासाठीं आवश्यक असतील अशीं इतर सर्व कामें करणें :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, प्रवर्तकास ह्या पोट-कलमाची रकम (ब) किंवा रकम (क) हीअन्वयें उपाययोजना करण्याचा, तीमुळें नुकसानी पोंचलेल्या मालमिळकतीचा मालक किंवा भोगवटा करणारा यांजकडून कोणतीहि हरकत घेण्यांत आली असली तरीहि, जर कलेक्टर, अशा मालकास किंवा भोगवटा करणारास लेखी नोटीस देऊन त्यास आपली बाजू मांडण्याची संधि दिल्यानंतर अशी उपाययोजना करण्यास परवानगी देईल तर, अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) च्या विशेष ठरावाअन्वयें हुकूम करतांना कलक्टरनें, त्याच्या मतें प्रवर्तकानें जी नुकसानभरपाईची किंवा वार्षिक भाड्याची किंवा दोन्हींची रक्कम त्यामुळें नुकसान झालेल्या मालमिळकतीच्या मालकास, किंवा स्थावर मालमिळकतीच्या बाबतींत, तिच्या मालकास किंवा तिचा भोगवटा करणारास दिली पाहिजे ती रक्कम ठरविली पाहिजे.

खुलासा.—ह्या कलमाच्या कारणांसाठीं, प्रवर्तक जर, सन १९१३ चा भारताचा कंपन्याविषयीं अधिनियम याच्या अर्थाप्रमाणें कंपनी नसेल किंवा स्थानिक प्राधिकारी नसेल तर, असा प्रवर्तक कंपनी आहे असें समजण्यांत आलें पाहिजे आणि सन १८९४ चा जमीन घेण्याविषयीं अधिनियम याच्या ७ व्या भागाचे ठराव, योग्य तो फेरफार करून, त्याच्या वतीनें स्थावर मालमिळकत संपादन करण्यास लागू असतील.

दुरुस्ती करण्यासाठीं किंवा अपघात टाळण्यासाठीं जमिनीवर तात्पुरता प्रवेश करणें.

**१६.** (१) नियमांस पात्र राहून, प्रवर्तकास हवाई रज्जुमार्गाची तपासणी करण्याच्या, दुरुस्ती करण्याच्या किंवा तो बदलण्याच्या किंवा कोणताहि अपघात टाळण्याच्या कारणासाठीं, सार्वजनिक रहदारीसाठीं असलेल्या अशा रज्जुमार्गाला लागून असलेल्या कोणत्याहि स्थावर मालमिळकतीवर कोणत्याहि वेळीं प्रवेश करण्याचा अधिकार असेल, आणि अशा कारणासाठीं त्यास आवश्यक वाटतील अशीं सर्व कामें करण्याचा त्यास अधिकार असेल.

(२) पोट-कलम (१) वरून दिलेले अधिकार चालवितांना प्रवर्तकानें शक्य तितकें कमी नुकसान केलें पाहिजे, आणि अशा रीतीनें केलेल्या कोणत्याहि नुकसानीदाखल त्यानें नुकसानभरपाई दिली पाहिजे; आणि अशी नुकसानभरपाईची रक्कम, किंवा ती ज्या इसमास द्यावयाची तो इसम यासंबंधीं तक्रार झाल्याच्या बाबतींत, ती बाब निर्णयाकरितां कलेक्टर-कडे लिहून पाठविली पाहिजे.

झाडें, इमले इत्यादि काढून टाकणें.

१७. (१) जेव्हां सार्वजनिक वाहतुकीसाठीं असलेल्या हवाई रज्जुमार्गाजवळ उभें असलेलें किंवा पडलेलें कोणतेंहि झाड, किंवा जेव्हां, अशा रज्जुमार्गाच्या बाबतींत कलम १० अन्वयें हुकूम करण्यांत आल्यानंतर अशा कोणत्याहि रज्जुमार्गाजवळ जो कोणताहि इमला किंवा इतर वस्तु ठेवलेली किंवा पडलेली असेल तो कोणताहि इमला किंवा ती वस्तु, रज्जुमार्ग बांधण्यास, तो सुस्थितींत ठेवण्यास, त्यांत बदल करण्यास किंवा त्याचा उपयोग करण्यास व्यत्यय आणीत असेल किंवा अडथळा करीत असेल, किंवा त्यामुळें व्यत्यय येण्याचा किंवा अडथळा होण्याचा संभव असेल तर कलेक्टरास, प्रवर्तकानें अर्ज केला असतां, तें झाड, तो इमला किंवा ती वस्तु काढून टाकविण्याचा किंवा त्यास योग्य वाटेल अशा इतर रीतीनें त्याची विल्हेवाट लावविण्याचा अधिकार असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वयेंच्या अर्जाची विल्हेवाट लावतांना कलेक्टरनें, हवाई रज्जुमार्ग बांधण्यांत येण्यापूर्वी अस्तित्वांत असलेल्या कोणत्याहि झाडाच्या बाबतींत, त्या झाडांत हितसंबंध असलेल्या इसमास, त्यास वाजवी वाटेल अशी नुकसानभरपाईची रक्कम, कोणतीही असल्यास, दिली पाहिजे आणि कलेक्टरास, तीच नुकसानभरपाई, जमीनमहसुलाची थकबाकी म्हणून प्रवर्तकाकडून त्याच रीतीनें वसूल करण्याचा अधिकार असेल.

खुलासा.—ह्या कलमाच्या कारणांसाठीं, "झाड" या संज्ञेंत कोणतेंहि झुडुप, कुंपण, जंगलांत वाढलेली किंवा इतर वनस्पति यांचा समावेश होतो असें समजण्यांत आलें पाहिजे.

**सार्वजनिक वाहतुकीसाठीं हवाई रज्जुमार्ग चालू ठेवणें.**

प्रवर्तकास दर ठरविण्याचा अधिकार असणें.

१८. सार्वजनिक वाहतुकीसाठींच्या हवाई रज्जुमार्गाच्या प्रवर्तकास, अशा रज्जुमार्गाच्या कारणांसाठीं, आणि ठरविण्यांत येतील अशा कमाल आणि किमान दरांस पात्र राहून, अशा रज्जुमार्गावरून प्रसंगाप्रमाणें, उतारू, जनावरें किंवा माल वाहून नेण्यासाठीं दर ठरविण्याचा वेळोवेळीं अधिकार असेल.

पक्षपाताशिवाय हवाई रज्जुमार्ग चालू

१९. कोणत्याहि प्रवर्तकानें, सार्वजनिक वाहतुकीसाठीं असलेला हवाई रज्जुमार्ग चालू ठेवण्याच्या कारणांसाठीं, कोणत्याहि विशिष्ट इसमास किंवा त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि विशिष्ट वर्णनाच्या वाहतुकीस, कोणत्याहि प्रकारें कोणतीहि अयोग्य किंवा गैरवाजवी पसंति किंवा

फायदा देतां कामा नये, किंवा कोणत्याहि विशिष्ट इसमाविषयीं किंवा कोणत्याहि विशिष्ट वर्णनाच्या वाहतुकीविषयीं कोणत्याहि प्रकारें कोणताहि अयोग्य किंवा गैरवाजवी प्रतिकूल ग्रह करून घेतां किंवा त्याची किंवा तिची नुकसानी होऊं देतां कामा नये. ठेवण्याचें प्रवर्तकाचें कर्तव्य.

**२०.** सार्वजनिक वाहतुकीसाठींचा हवाई रज्जुमार्ग चालू ठेवतांना पुढील अपघातांपैकीं कोणताहि अपघात, म्हणजे— अपघातांचा रिपोर्ट करणें.

(अ) भारताचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा यांत व्याख्या केल्याप्रमाणें मानवी जीवितास हानी करणारा किंवा गंभीर दुखापत करणारा, किंवा मालमत्तेची गंभीर नुकसानी करणारा कोणताहि अपघात ;

(ब) बहुधा मानवी जीवितास हानी करणारा किंवा वर सांगितल्याप्रमाणेंची गंभीर दुखापत करणारा किंवा मालमत्तेची गंभीर नुकसानी करणारा कोणताहि अपघात ;

(क) राज्य सरकार याबाबत नियमांत निर्दिष्ट करील असा इतर कोणत्याहि प्रकारचा अपघात,

घडून येईल, तेव्हां, प्रवर्तकानें अनावश्यक विलंब न लावतां, राज्य सरकारकडे आणि इन्स्पेक्टरकडे अपघाताची नोटीस पाठविली पाहिजे आणि ज्या ठिकाणीं अपघात घडला त्या ठिकाणापासून सर्वांत जवळ असलेल्या हवाई रज्जुमार्गावरील स्टेशन स्वाधीन असलेल्या प्रवर्तकाच्या नोकरानें, किंवा असें स्टेशन नसेल तेव्हां, ज्या हवाई रज्जुमार्गाच्या भागावर अपघात घडला तो हवाई रज्जुमार्गाचा भाग स्वाधीन असलेल्या प्रवर्तकाच्या नोकरानें, शक्य तितका कमी विलंब लावून, बृहन्मुंबईंत पोलिस कमिशनरास आणि इतरत्र, ज्या जिल्ह्यांत अपघात घडला असेल त्या जिल्ह्याच्या मॅजिस्ट्रेटास आणि ज्या पोलिस स्टेशनच्या स्थानिक हद्दींच्या आंत असा अपघात घडला असेल तें पोलिस ठाणें स्वाधीन असलेल्या अधिकाऱ्यास अपघाताची नोटीस दिली पाहिजे.

**२१.** (१) जर, सार्वजनिक वाहतुकीसाठीं चालू केलेल्या कोणत्याहि हवाई रज्जुमार्गाची तपासणी केल्यानंतर, इन्स्पेक्टरचें असें मत असेल कीं, हवाई रज्जुमार्ग किंवा त्याचा कोणताहि विशिष्ट भाग लोकांना बिनधोक वापरतां येणें शक्य नाहीं, किंवा कोणतीहि विशिष्ट वर्गाची वाहतूक यापुढें चालू ठेवण्यासारख्या स्थितींत नाहीं तर, त्यानें तसें मत आणि त्यासाठींचीं कारणें राज्य सरकारला नमूद केलीं पाहिजेत. हवाई रज्जुमार्ग बंद करण्याचा आणि पुन्हां चालू करण्याचा अधिकार.

(२) राज्य सरकारास, त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी कोणतीहि असल्यास, केल्यानंतर, हुकुमांत निर्दिष्ट करावयाच्या कारणांसाठीं, हवाई रज्जुमार्ग किंवा अशा रीतीनें निर्दिष्ट केलेला त्याचा भाग

सर्व वाहतुकीसाठीं किंवा निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि वर्गाच्या वाहतुकीसाठीं बंद ठवण्यांत आला पाहिजे असा हुकूम करण्याचा अधिकार आहे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अत्यंत निकडीच्या बाबतींत इन्स्पेक्टरास, या बाबीवर राज्य सरकारचे हुकूम होईपर्यंत हवाई रज्जुमार्ग किंवा त्याचा कोणताहि भाग चालू ठेवण्याचें तहकूब ठेवणें त्यास आवश्यक वाटेल तर तसें तहकूब ठेवण्याबद्दल हुकूम करण्याचा अधिकार असल.

(३) जेव्हां पोट-कलम (२) अन्वयें, हवाई रज्जुमार्ग किंवा त्याचा कोणताहि भाग कोणत्याहि वाहतुकीस बंद करण्यांत येईल तेव्हां, त्याची ठरविलेल्या रीतीनें तपासणी करण्यांत येईपर्यन्त आणि तो पुन्हां चालू करण्यास मंजुरी मिळेपर्यंत, तो अशा वाहतुकीसाठीं पुन्हां चालू करतां कामा नये.

**सार्वजनिक वाहतुकीसाठीं असलेले हवाई रज्जुमार्ग बंद ठेवणें.**

हवाई रज्जुमार्ग बंद ठेवण्यांत आला असतां प्रवर्तकाचे अधिकार चालू असण्याचें बंद होणे.

२२. जर, सार्वजनिक वाहतुकीसाठीं असलेला हवाई रज्जुमार्ग चालू झाल्यानंतर कोणत्याहि वेळीं, राज्य सरकारची खात्री होईल अशा रीतीनें असें सिद्ध करण्यांत येईल कीं, प्रवर्तकानें हवाई रज्जुमार्ग किंवा त्याचा कोणताहि भाग चालू ठेवण्याचें सतत तीन महिने किंवा त्याहून ज्यास्त मुदतीपर्यंत बंद ठेविलें असेल आणि असें बंद ठेवणें योग्य ठरण्यास राज्य सरकारच्या मतें पुरेसें कारण नसेल तर, राज्य सरकारास, त्यास योग्य वाटेल तर, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून असें जाहीर करण्याचा अधिकार आहे कीं, प्रवर्तकाचे अशा रज्जुमार्गाच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधांतील अधिकार संपविण्यांत आले आहेत, आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून प्रवर्तकानें असे अधिकार चालविण्याचें बंद केलें पाहिजे.

प्रवर्तकानें अधिकार चालविण्याचें बंद करण्यांत आल्यानंतर हवाई रज्जुमार्ग काढून टाकण्याचा अधिकार.

२३. (१) जेव्हां, कलम २२ अन्वयें कोणत्याहि हवाई रज्जुमार्गाच्या किंवा त्याच्या भागाच्या बाबतींत अधिसूचना प्रसिद्ध करण्यांत आलेली असेल तव्हां,—

(अ) त्याबाबत राज्य सरकारनें नेमलेल्या अधिकाऱ्यास, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून दोन महिने संपल्यानंतर कोणत्याहि वेळीं, प्रसंगाप्रमाणें, असा रज्जुमार्ग किंवा त्याचा भाग काढून टाकण्याचा अधिकार आहे; आणि

(ब) प्रवर्तकानें अशा रीतीनें नेमलेल्या अधिकाऱ्यास, त्या अधिकाऱ्यास काढून टाकण्याबद्दल जो खर्च झाल्याचा त्यानें दाखला दिला असेल तो खर्च दिला पाहिजे.

(२) प्रवर्तक जर, दाखला किंवा त्याची प्रत त्याच्या स्वाधीन करण्यांत आल्यानंतर एका महिन्याच्या आंत असा दाखला दिलेली खर्चाची रक्कम देण्यांत कसूर करील तर,—

(अ) अशा अधिकाऱ्यास प्रवर्तकास कोणतीहि आगाऊ नोटीस न देतां आणि सदरहू रक्कम वसूल करण्यासाठीं त्याच्याजवळ

असलेल्या कोणत्याहि इतर उपायास बाध न आणतां, अशा रीतीनें काढून टाकलेल्या हवाई रज्जुमार्गाचें किंवा त्याच्या भागाचें सामान विकण्याचा व त्याची विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे ; आणि

(ब) अशा अधिकाऱ्यास, मिळालेल्या विक्रीच्या पैशांतून, वर सांगितल्याप्रमाणेंच्या दाखला दिलेल्या खर्चाची आणि विक्रीच्या खर्चाची रक्कम स्वत: भरण्याचा व परत करण्याचा अधिकार आहे ; आणि

(क) अशा अधिकाऱ्यानें अशा विक्रीच्या उत्पन्नाची राहिलेली शिल्लक प्रवर्तकास दिली पाहिजे.

### सार्वजनिक वाहतुकीसाठींचा हवाई रज्जुमार्ग खरेदी करणें.

२४. (१) जेव्हां कलम १० अन्वयेंचा हुकूम, सार्वजनिक वाहतुकी-साठीं असलेल्या हवाई रज्जुमार्गाच्या, स्थानिक प्राधिकारी नसलेल्या प्रवर्तकाच्या बाजूनें करण्यांत आला असेल तेव्हां, राज्य सरकारास किंवा [illegible] कलम १० अन्वयें पारित केलेल्या हुकुमांत निर्दिष्ट केलेल्या स्थानिक प्राधिकाऱ्यास, अशा हुकुमांत निर्दिष्ट करण्यांत येईल अशी एकवीस वर्षांपेक्षां अधिक नाहीं इतकी मुदत आणि अशी सात वर्षांपेक्षां अधिक नाहीं इतकी त्यानंतरची प्रत्येक मुदत संपल्यानंतर, अंडरटेकिंगची खरेदी करण्याचा विकल्प असेल, आणि जर राज्य सरकार किंवा राज्य सरकारच्या आगाऊ मंजुरीनें स्थानिक प्राधिकारी अशा रीतीनें अंडरटेकिंग खरेदी करणें पसंत करील तर, प्रवर्तकानें तें अंडर-टेकिंग प्रसंगाप्रमाणें, राज्य सरकारास किंवा स्थानिक प्राधिकाऱ्यास अंडरटेकिंगला योग्य असलेल्या व प्रवर्तकानें अंडरटेकिंगच्या कारणांकरितां वापरलेल्या त्याच्या सर्व जमिनी, इमारती, काम, सामान, प्लान्ट आणि उपकरणें यांची किंमत दिली असतां, विकलें पाहिजे आणि अशी किंमत मतभेद किंवा तक्रार असल्याच्या बाबतींत लवादानें ठरविली पाहिजे :

सार्वजनिक वाहतुकी-साठीं असलेले हवाई रज्जु-मार्ग खरेदी करण्याचा राज्य सरकारचा आणि स्थानिक प्राधिका-यांचा अधिकार.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा जमिनी, इमारती, कामें, सामान, प्लान्ट आणि उपकरणें यांची किंमत ही, अशा जमिनी, इमारती, कामें, सामान, प्लान्ट आणि उपकरणें यांचें त्या त्या वेळचें स्वरूप आणि स्थिति, आणि त्यांची दुरुस्त स्थिति, आणि तीं कामें लगेच चालू करण्याच्या स्थितींत आहेत ही परिस्थिति, आणि अंडरटेकिंगच्या कारणांसाठीं तीं योग्य आहेत ही गोष्ट यांकडे योग्य लक्ष पुरवून, खरेदीच्या वेळची त्यांची बाजारभावाप्रमाणेंची वाजवी किंमत आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

(२) जेव्हां पोट-कलम (१) अन्वयें खरेदी केलेली असेल तेव्हां—

(अ) तें अंडरटेकिंग, प्रवर्तकाच्या किंवा अंडरटेकिंगशीं निगडीत असलेल्या कोणत्याहि कर्जांपासून, गहाणांपासून किंवा तत्सम जबाब-दाऱ्यांपासून मुक्त अशा रीतीनें खरेदीदाराकडे निविष्ट होईल ;

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशी कोणतीहि कर्जें, गहाण किंवा तत्सम जबाबदाऱ्या ह्या अंडरटेकिंगच्या बदला खरेदीच्या रकमेशीं निगडीत होतील; आणि

(ब) पूर्वी सांगितल्याप्रमाणें असेल तें खेरीजकरून, कलम १० अन्वयें प्रसिद्ध झालेला हुकूम हा पूर्णपणें अंमलांत राहील, आणि खरेदी करणारा हा प्रवर्तक आहे असें समजण्यांत आलें पाहिजे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, जेव्हां राज्य सरकार खरेदी करणें पसंत करील तेव्हां, कलम १० अन्वयेंच्या हुकुमाचा, खरेदीनंतर, राज्य सरकारचा जेथवर संबंध असेल तेथवर, कोणताहि अधिक अंमल असण्याचें बंद होईल, परंतु ह्या अधिनियमाचें कलम ३३ खेरीज-करून इतर सर्व ठराव, जेथवर त्यांचा सार्वजनिक वाहतुकीसाठीं असलेल्या हवाई रज्जुमार्गाशीं संबंध असेल तेथवर, राज्य सरकारनें अशा रीतीनें खरेदी केलेल्या अंडरटेकिंगच्या बाबतीत लागू असतील.

(३) प्रसंगाप्रमाणें, राज्य सरकारनें किंवा स्थानिक प्राधिकाऱ्यानें, ह्या कलमाअन्वयें खरेदी करण्याचें पसंत केल्याबद्दलची दोन वर्षांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीची लेखी नोटीस प्रवर्तकावर बजाविली पाहिजे.

(४) यांत यापूर्वी कोणताहि मजकूर असला तरीहि, स्थानिक प्राधि-काऱ्यास, राज्य सरकारच्या आगाऊ मंजुरीनें, त्याचा खरेदी करण्याचा विकल्प सोडून देण्याचा आणि पोट-कलम (१) मध्यें पसंत केलेली नंतरची दुसरी मुदत संपेपर्यंत, कबुलायतींत नमूद करण्यांत येतील अशा अटींवर व शर्तींवर प्रवर्तकानें अंडरटेकिंग चालविण्यासाठीं त्याच्याशीं कबुलायत करण्याचा अधिकार असेल.

खरेदी करण्याचा विकल्प चालविण्यांत किंवा संमतीनें हुकूम रद्द करण्यांत आला असेल तेव्हां विकण्याचा प्रवर्तकास अधिकार असणें.

२५. जेव्हां कलम २४ मध्यें उल्लेख केलेल्या मुदतींपैकीं कोणतीहि मुदत संपल्यावर, राज्य सरकारनें किंवा स्थानिक प्राधिकाऱ्यानें अंडर-टेकिंगची खरेदी केली नाहीं, आणि प्रवर्तकानें अर्ज केल्यावर किंवा त्याच्या संमतीनें, कलम १० अन्वयें प्रसिद्ध केलेला हुकूम रद्द करण्यांत आला असेल तर, प्रवर्तकास, त्यास योग्य वाटेल अशा रीतीनें, अंडर-टेकिंगच्या मालकीच्या सर्व जमिनी, इमारती, कामें, सामान, प्लांट आणि उपकरणें यांची विल्हेवाट लावण्याचा विकल्प असेल.

**प्रवर्तकाची असमर्थता किंवा नादारी.**

*प्रवर्तकाची असमर्थता किंवा नादारी याबाबत कामकाजें.*

२६. (१) जर, सार्वजनिक वाहतुकीसाठीं असलेला हवाई रज्जुमार्ग चालू केल्यानंतर कोणत्याहि वेळीं, राज्य सरकारास असें वाटेल कीं, प्रवर्तक हा, नादार आहे किंवा हवाई रज्जुमार्ग सुस्थितींत ठेवण्यास, किंवा तो लोकांना फायदा होईल अशा रीतीनें चालविण्यास किंवा मुळांत चालविण्यासच असमर्थ आहे तर, राज्य सरकारास असें जाहीर करण्याचा अधिकार आहे कीं, अशा हवाई रज्जुमार्गासंबंधींचे प्रवर्तकाचे अधिकार, असें जाहीर केल्याच्या तारखेपासून सहा महिने संपल्यानंतर, संपविण्यांत येतील ; आणि त्यानंतर प्रवर्तकानें ती मुदत संपल्यानंतर असे अधिकार चालविण्याचें बंद केलें पाहिजे.

(२) सदरहू सहा महिन्यांची मुदत संपल्यानंतर कोणत्याहि वेळीं, त्याबाबत राज्य सरकारनें नेमलेल्या अधिकाऱ्यास, सन १९०९ चा इलाख्याच्या मुख्य शहरांतील नादारीसंबंधीं अधिनियम किंवा सन १९२० चा प्रॉव्हिन्शिअल नादारीचा अधिनियम यांत कोणताहि मजकूर असला तरीहि, प्रत्यक बाबतींत, कलम २३ अन्वयें काढून टाकण्याच्या संबंधांत जी रीत असेल त्याच रीतीनें व सर्व देण्यासंबंधीं जे ठराव असतील त्याच ठरावांना आणि तो वसूल करण्यास जो उपाय असेल त्याच उपायास पात्र राहून, हवाई रज्जुमार्ग काढून टाकण्याचा अधिकार असेल.

*स्थानिक प्राधिकाऱ्यानें हवाई रज्जुमार्ग पट्ट्यानें देण्याबाबत.*

२७. (१) जेव्हां सार्वजनिक वाहतुकीसाठीं असलेल्या हवाई रज्जुमार्गाचा प्रवर्तक हा, स्थानिक प्राधिकारी असेल किंवा जेव्हां एखाद्या स्थानिक प्राधिकाऱ्यानें कलम २४ अन्वयें कोणताहि असा रज्जुमार्ग खरेदी केला असेल तेव्हां, अशा स्थानिक प्राधिकाऱ्यास, राज्य सरकारच्या आगाऊ मंजुरीनें आणि राज्य सरकारास लादण्यास योग्य वाटतील अशा शर्तींस पात्र राहून, कोणत्याहि इसमास, हवाई रज्जुमार्ग वापरण्याचा आणि ठरविण्यांत यतील अशा कमाल व किमान दरांस पात्र ठेवून, अशा रज्जुमार्गावर, प्रसंगाप्रमाणें, उतारू, जनावरें किंवा माल नेण्यासाठीं दरांची मागणी करण्याचा व ते घेण्याचा हक्क, पट्टा करून, देण्याचा अधिकार असेल.

(२) अशा पट्ट्याची मुदत संपल्यानंतर, स्थानिक प्राधिकाऱ्यास तो पट्टा, राज्य सरकार मान्य करील अशा आणखी मुदतीसाठीं आणि अशा शर्तींवर, वेळोवेळीं नवीन करून देण्याचा अधिकार असेल.

(३) ह्या कलमाअन्वयें केलेल्या प्रत्येक पट्ट्यांत, जर तो केल्यानंतर किंवा तो नव्यानें केल्यानंतर कोणत्याहि वेळीं राज्य सरकारची खात्री होईल अशा रीतीनें असें सिद्ध करण्यांत येईल कीं, पट्टा घेणारानें अशा रीतीनें पट्ट्यानें घेतलेला हवाई रज्जुमार्ग किंवा त्याचा कोणताहि भाग चालू ठेवण्याचें एक महिनाभर थांबविलें आहे आणि असें थांबविणें योग्य ठरण्यास राज्य सरकारच्या मतें पुरेसें कारण नाहीं तर, तो पुन्हां करण्याची शर्त गर्भित असेल.

(४) ज्या कोणत्याहि इसमास, प्रवर्तकाचा कोणताहि हक्क, पोट-कलम (१) किंवा (२) याअन्वयें पट्टयानें दिला असल त्या कोणत्याहि इसमानें, स्थानिक प्राधिकाऱ्यास, स्थानिक प्राधिकारी पट्टयाच्या शर्ती योग्य रीतीनें पुऱ्या होण्याकरितां ठरवील इतक्या रकमेचें तारण दिलें पाहिजे.

(५) ज्या इसमास पोट-कलम (१) किंवा (२) याअन्वयें प्रवर्तकाचा कोणताहि हक्क दिलेला असेल त्या कोणत्याहि इसमानें असा हक्क, पट्टयाच्या शर्ती आणि ह्या अधिनियमाचे ठराव आणि नियम यांनुसार असेल तें खेरीजकरून, चालवितां कामा नये आणि ह्या अधिनियमाच्या ठरावांपैकीं कोणताहि ठराव किंवा नियम यांचें उल्लंघन झाल्याच्या बाबतींत तो, प्रवर्तक ज्या जबाबदारीस पात्र असेल त्याच जबाबदारीस पात्र असेल.

## तपासणी आणि सुधारणा.

**कलम १० किंवा कलम २१ अन्वयेंच्या हुकुमांची तपासणी.**

२८. (१) जेव्हां कलम १० अन्वयें किंवा कलम २१ अन्वयें केलेल्या हुकुमामुळें कोणत्याहि इसमास नुकसानी पोहोंचली असेल तेव्हां, अशा इसमास, ठरविलेली फी दिल्यावर, सदरहू हुकूम केल्यापासून तीस दिवसांच्या आंत, त्या हुकुमाची पुन्हां तपासणी करण्यासाठीं राज्य सरकार-कडे अर्ज करण्याचा अधिकार असेल, आणि राज्य सरकारनें नंतर, ठरविलेल्या रीतीनें सल्लागार मंडळाचा सल्ला घेतला पाहिजे आणि अशा सल्ल्यावर विचार केला पाहिजे आणि त्या बाबतींत राज्य सरकारास न्याय्य आणि योग्य वाटतील असे हुकूम केले पाहिजेत.

(२) पोट-कलम (१) अन्वयें मंडळास त्यांचा सल्ला देणें शक्य व्हावें म्हणून, मंडळास, राज्य सरकारच्या संमतीनें आणि ठरविण्यांत येईल अशी आणखी फी दिल्यावर, या बाबतींत मंडळास आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करण्याचा अधिकार असेल.

**कलेक्टरचे हुकूम राज्य सरकारनें फेरतपासणी करण्यास पात्र असणें.**

२९. कलम १५, पोट-कलम (१) याचा विशेष ठराव किंवा पोट-कलम (२), कलम १६ किंवा कलम १७, पोट-कलम (१) यांत उल्लेख केलेल्या कोणत्याहि बाबीच्या संबंधांत कोणताहि दावा चालणार नाहीं, परंतु त्या कलमांपैकीं कोणत्याहि कलमाअन्वयें कलेक्टरनें केलेला प्रत्येक हुकूम आणि कलम १७, पोट-कलम (२) अन्वयें त्यानें केलेला प्रत्येक निवाडा हे, कलम १५, पोट-कलम (१), रकम (ब) किंवा (क) ही अन्वयें केलेल्या उपाययोजनेमुळें कलेक्टरनें केलेल्या नुकसानभरपाईच्या निवाडयाच्या—जो, बृहन्मुंबईंत सिटी सिव्हिल कोर्टाच्या जज्जाकडून आणि इतरत्र डिस्ट्रिक्ट जज्जाकडून सुधारणा केली जाण्यास पात्र असेल—बाबतींत असेल तें खेरीजकरून, राज्य सरकारकडून सुधारणा केली जाण्यास पात्र असतील.

## बाब ४.

### विवक्षित कारणांसाठींचे खाजगी हवाई रज्जुमार्ग.

*विवक्षित खाजगी हवाई रज्जुमार्गांच्या बाबतींत जमीन संपादन करण्या-साठींचा अर्ज.*

३०. (१) जेव्हां खाजगी वाहतुकीसाठीं एखादा हवाई रज्जुमार्ग बांधणें, त्याची वाढ करणें, तो चालू ठेवणें किंवा त्याची व्यवस्था ठेवणें हें, सामान्य उपयोगांत असलेल्या वस्तूंची नआण करणें त्यामुळें सुलभ होत असल्याच्या कारणावरून जनतेस उपयुक्त ठरण्याचा संभव आहे किंवा तें, अशा वस्तु राखून ठेवण्यासाठीं किंवा त्यांचा पुरवठा करण्या-साठीं आवश्यक आहे अशी राज्य सरकारची खात्री होईल आणि जेव्हां अशा रज्जुमार्गाचा प्रवर्तक होण्याचा इरादा असलेल्या इसमाची अशा रीतीनें रज्जुमार्ग बांधण्याच्या, त्याची वाढ करण्याच्या, तो चालू ठेवण्याच्या किंवा त्याची व्यवस्था ठेवण्याच्या कारणासाठीं कोणतीहि जमीन मिळवि-ण्याची इच्छा असेल तेव्हां, राज्य सरकारास, अशा प्रवर्तकाचा अर्ज आला असतां, सार्वजनिक कारणांसाठीं जमीन संपादन करण्याकरितां त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या ठरावांअन्वयें त्याच्या वतीनें अशी जमीन संपादन करण्याचा किंवा सन १८९४ चा जमीन घेण्याविषयी अधिनियम याच्या ६ व्या भागाच्या ठरावांअन्वयें ती तात्पुरता भोगवटयांत घेण्याचा—मग सदरहू प्रवर्तक होण्याचा इरादा असलेला इसम, त्या अधिनियमांत व्याख्या केल्याप्रमाणेंची कंपनी असो अगर नसो—अधिकार आहे.

(२) राज्य सरकारनें, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून पोट-कलम (१) च्या कारणांसाठीं, ज्या वस्तु सामान्यपणें उपयोगांत आहेत, असें समजण्यांत येत असेल त्या वस्तु जाहीर केल्या पाहिजेत.

खुलासा.—ह्या अधिनियमाच्या कारणांसाठीं जर एखादा प्रवर्तक हा सन १९१३ चा भारताचा कंपन्यांबाबत अधिनियम याच्या अर्थाप्रमाणें कंपनी नसेल किंवा स्थानिक प्राधिकारी नसेल तर, असा प्रवर्तक हा कंपनी आहे असें समजण्यांत आलें पाहिजे आणि सन १८९४ चा जमीन घेण्याविषयीं अधिनियम याच्या ७ व्या भागाचे ठराव, योग्य त्या फेरफारांसह, त्याच्या वतीनें स्थावर मिळकत संपादन करण्यास लागू होतील.

*कबुलायत.*

३१. (१) यांत यापुढें तरतूद करण्यांत आल्याप्रमाणेंची चौकशी करण्यांत येईपर्यंत व पोट-कलम (४) मध्यें निर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधांत प्रवर्तक होण्याचा इरादा असलेला इसम राज्य सरकारबरोबर कबुलायत करील तोंपर्यंत राज्य सरकारनें कलम ३०, पोट-कलम (१) अन्वयें कोणताहि हुकूम करतां कामा नये.

(२) अशी चौकशी, राज्य सरकार नेमील अशा अधिकाऱ्यानें व अशा वेळीं व अशा जागीं केली पाहिजे.

(३) अशा अधिकाऱ्यास, साक्षिदारांना समन्स काढून बोलावण्याचा व त्यांस हजर राहण्याची सक्ती करण्याचा व दिवाणी कोर्टाच्या बाबतींत, सन १९०८ चा दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा

यांत तरतूद करण्यांत आलीं आहे त्याच मार्गांनीं व जेथवर शक्य होईल तेथवर, त्याच रीतीनें कागदपत्रं हजर करण्यास भाग पाडण्याचा अधिकार आहे.

(४) अशा अधिकाऱ्यानें, चौकशीच्या निकालाचा राज्य सरकारकडे रिपोर्ट केला पाहिजे आणि जर सदरहू हवाई रज्जुमार्ग लोकांस उपयुक्त आहे किंवा उपयुक्त होण्याचा संभव आहे अशी राज्य सरकारची खात्री होईल तर त्यानें, नियमांस पात्र राहून, प्रवर्तक होण्याचा इरादा असलेल्या इसमास राज्य सरकारबरोबर, पुढील बाबींसाठीं, राज्य सरकारची खात्री होईल अशा रीतीनें, तरतूद करणारी कबुलायत करण्यास फर्मावलें पाहिजे :—

(अ) ज्या शर्तींवर प्रवर्तकानें, हवाई रज्जुमार्ग धारण केला पाहिजे त्या शर्ती;

(ब) ज्या वेळांत व ज्या शर्तींवर हवाई रज्जुमार्ग बांधला, तो सुस्थितींत ठवला व उपयोगांत आणला पाहिजे ती वेळ व त्या शर्ती.

(५) अशी प्रत्येक कबुलायत, ती करण्यांत आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राजपत्रांत प्रसिद्ध केली पाहिजे.

**खाजगी हवाई रज्जुमार्गाच्या बाबतींत जमिनीचा तात्पुरता भोगवटा करणें.**

३२. जर, कलम ३०, पोट-कलम (१) याच्या ठरावांनुसार हवाई रज्जुमार्गाच्या प्रवर्तकाच्या वतीनें खाजगी वाहतुकीसाठीं जमिनीचा तात्पुरता भोगवटा करावयाचा असेल व प्रवर्तकानें अर्ज केल्यावर, राज्य सरकार तसें फर्मावील तर, सन १८९४ चा जमीन घेण्याविषयीं अधिनियम याच्या ४ थ्या भागाचे ठराव, सन १८९४ चा जमीन घेण्याविषयीं अधिनियम याच्या ३६ व्या कलमांत कोणताहि ठराव असला तरीहि, प्रवर्तकानें भोगवटा केलेल्या जमिनीचा भोगवटा व उपयोग करण्याचें, राज्य सरकार निश्चित करील अशा दहा वर्षांहून अधिक नाहीं इतक्या मुदतीपर्यंत चालू राहील व अशा जमिनींत हितसंबंध असलेल्या इसमास देण्याजोगी नुकसानभरपाई, अशा भोगवटा करण्याच्या कारणामुळें खनिज पदार्थ मिळण्यांत अडथळा झाल्यानें होणारें नुकसान धरून, भोगवटा करण्याच्या अशा मुदतीच्या कारणामुळें त्यांस होणारें कोणतेंहि जादा नुकसान किंवा गैरसोय यांकडे योग्य लक्ष पुरवून निश्चित केली पाहिजे. ह्या तरतुदींस पात्र ठेवून, अशा भोगवट्यास लागू होतील.

## भाग ६.

## अपराध, शिक्षा व धरणें.

**एखाद्या इसमानें किंवा प्रवर्तकानें अधिनियमाबरहुकूम वागण्यांत कसूर करणें.**

३३. (१) जर कोणताहि इसम कलम ५ च्या ठरावांचें उल्लंघन करून कोणताहि हवाई मार्ग बांधील, सुरू करील, सुस्थितींत ठेवील किंवा चालवील, किंवा

(२) जर, सार्वजनिक वाहतुकीसाठींच्या हवाई रज्जुमार्गाचा कोणताहि प्रवर्तक—

(अ) कलम १० अन्वयें केलेल्या हुकुमाच्या ठरावांनुसार असेल तें खेरीजकरून इतर रीतीनें एखादा हवाई रज्जुमार्ग बांधील किंवा सुस्थितींत ठेवील, किंवा

(ब) कलम १३ च्या ठरावांबरहुकूम वागण्यांत कसूर करील, किंवा

(क) कलम १४ च्या ठरावांपैकीं कोणत्याहि ठरावाचें उल्लंघन करून एखादा रज्जुमार्ग सुरू करील किंवा तो सुरू करण्याची परवानगी देईल, किंवा

(ड) कलम १५, १६, १७ किंवा २९ याअन्वयें निर्णय करण्यांत आलेली कोणतीहि नुकसानभरपाई वाजवी वेळांत देण्यांत कसूर करील, किंवा

(इ) कलम १९ च्या ठरावांपैकीं कोणत्याहि ठरावाचें उल्लंघन करील, किंवा

(फ) कलम २० अन्वयें आवश्यक असल्याप्रमाणें कोणत्याहि अपघाताची नोटीस पाठविण्यांत कसूर करील, किंवा

(ग) कलम २१, पोट-कलम (१) अन्वयें केलेल्या हुकुमानुसार हवाई रज्जुमार्ग बंद करण्यांत कसूर करील किंवा त्या कलमाच्या (२) त्या पोट-कलमाचें उल्लंघन करून कोणताहि हवाई रज्जुमार्ग पुन्हां सुरू करील, किंवा

(ह) कलम २२ च्या किंवा कलम २६ च्या ठरावांचें उल्लंघन करून कोणत्याहि हवाई रज्जुमार्गाच्या संबंधांत प्रवर्तकाचे अधिकार चालविण्याचें चालू ठेवील, किंवा

(आय्) कलम ३८ च्या ठरावांबरहुकूम वागण्यांत कसूर करील, किंवा

(जे) कलम ३९ च्या ठरावांपैकीं कोणत्याहि ठरावाचें उल्लंघन करील, किंवा

(के) कलम ४५ अन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमाच्या ठरावांचें उल्लंघन करील,

तर, प्रसंगाप्रमाणें, अशा इसमास किंवा प्रवर्तकास, ह्या अधिनियमाच्या आवश्यक गोष्टी खास रीतीनें पार पाडण्याच्या किंवा त्याच्या विरुद्ध करतां येईल अशा इलाजाच्या अंमलबजावणीस बाध न येतां, त्याजवर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यावर, पराकाष्ठा

दोनशें रुपये दंडाची शिक्षा होईल आणि अपराध चालू ठेवल्याच्या बाबतींत, रकम (२), पोट-रकम (ड), (इ), (फ), (आय्), (जे) किंवा (के) हींत निर्दिष्ट केलेल्या अपराधाच्या बाबतींत, पहिल्या अपराधशाबितीनंतरच्या ज्या मुदतींत अपराध घडण्याचें चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल पराकाष्ठा पन्नास रुपये आणि रकम (१) किंवा रकम (२) ची पोट-रकम (अ), (ब), (क), (ग) किंवा (ह) हींत निर्दिष्ट केलेल्या अपराधाच्या बाबतींत पराकाष्ठा एक हजार रुपये जादा दंडाची शिक्षा होईल.

प्रवर्तकास किंवा पट्टयानें घेणारास, त्याचे अधिकार चालवितांना बेकायदेशीरपणें अडथळा करणें.

३४. जर कोणताहि इसम, कायदेशीर सबबीवांचून—व ती शाबीत करण्याची जबाबदारी त्याच्यावर असेल—प्रवर्तकाच्या अधिकाराखालीं काम करणाऱ्या कोणत्याहि इसमास, हवाई रज्जुमार्ग बांधण्याचे, तो सुस्थितींत ठेवण्याचे, त्यांत बदल करण्याचे, त्याची दुरुस्ती करण्याचे, त्याचा उपयोग करण्याचे किंवा तो चालू ठेवण्याचे आपले अधिकार कायदेशीर रीतीनें चालवितांना बुद्धया अडथळा आणील किंवा अशा रज्जुमार्गाची रेषा किंवा मार्ग आंखण्याच्या कारणासाठीं केलेली कोणतीहि खूण नष्ट करील तर त्यास, त्याजवर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यावर, पराकाष्ठा दोनशें रुपये दंडाची शिक्षा होईल.

हवाई रज्जुमार्गात बेकायदेशीरपणें ढवळाढवळ करणें.

३५. जर कोणताहि इसम, कायदेशीर सबबीवांचून—व ती शाबीत करण्याची जबाबदारी त्याच्यावर असेल—पुढील गोष्टींपैकीं कोणतीहि गोष्ट बुद्धया करील, म्हणजे :—

(अ) हवाई रज्जुमार्गाच्या किंवा त्याशीं संबंध असलेल्या कोणत्याहि कामांच्या कोणत्याहि भागांत ढवळाढवळ करील, तो काढून नेईल किंवा त्यांत बदल करील,

(ब) हवाई रज्जुमार्गावरून चालणाऱ्या कोणत्याहि वाहनास अडथळा होईल अशा रीतीनें कोणतीहि गोष्ट करील,

(क) रकम (अ) किंवा रकम (ब) मध्यें निर्दिष्ट केलेली कोणतीहि गोष्ट करण्याचा प्रयत्न करील किंवा करण्यास, भारताचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा याच्या अर्थाप्रमाणें, साहाय्य करील,

तर त्यास, एखाद्या कोर्टांत त्याच्याविरुद्ध करतां येईल अशा कोणत्याहि इलाजास बाध न येतां, त्याजवर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यावर, पराकाष्ठा दोनशें रुपये दंडाची शिक्षा होईल.

**३६.** जर कोणताहि इसम कलम ३५, रकम (अ), (ब) किंवा (क) हींत निर्दिष्ट केलेली कोणतीहि गोष्ट करील किंवा हवाई रज्जुमार्गावरून प्रवास करणाऱ्या किंवा त्यावर असणाऱ्या कोणत्याहि इसमाच्या सुरक्षिततेस त्याजकडून धोका उत्पन्न करण्याच्या हेतूनें किंवा तो होण्याचा संभव आहे हें माहित असून हवाई रज्जुमार्गाच्या संबंधांत इतर कोणतेंहि कृत्य किंवा गोष्ट, भारताचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा याच्या अर्थानुसार करील किंवा करण्याचा प्रयत्न करील किंवा त्यास साहाय्य करील तर त्यास, त्याजवर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यावर, पराकाष्ठा चौदा वर्षें मुदतीची कैदेची शिक्षा होईल.

हवाई रज्जुमार्गावरून प्रवास करणाऱ्या किंवा त्यावर असणाऱ्या इसमांच्या सुरक्षिततेस धोका पोहोंचेल अशी कोणतींहि कृत्यें द्वेषबुद्धीनें करणें, तीं करण्यास साहाय्य करणें किंवा तीं करण्याचा प्रयत्न करणें.

**३७.** (१) जर कोणताहि इसम, कलम ३५ किंवा ३६ अन्वयें शिक्षा होण्याजोगा कोणताहि अपराध करील तर, अशा इसमास वॉरंटावांचून किंवा इतर लेखी अधिकारावांचून धरण्याचा प्रवर्तकाच्या कोणत्याहि नोकरास किंवा कोणत्याहि पोलिस अधिकाऱ्यास किंवा असा नोकर किंवा अधिकारी त्याच्या साहाय्यास बोलावील अशा इतर कोणत्याहि इसमास अधिकार आहे.

विवक्षित कलमांखाली केलेल्या अपराधांबद्दल धरणें.

(२) जेव्हां, असा कोणताहि नोकर किंवा इतर कोणताहि इसम, पोट-कलम (१) अन्वयें कोणत्याहि इसमास धरील तेव्हां त्यानें, अशा रीतीनें धरलेल्या इसमास एखाद्या पोलिस अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलें पाहिजे किंवा पोलिस अधिकारी नसल्यास अशा इसमास सर्वांत जवळच्या पोलिस ठाण्याच्या रखवालींत नेलें पाहिजे किंवा नेवविलें पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वयें धरलेल्या कोणत्याहि इसमास, त्या प्रकरणाच्या सर्व परिस्थितींत वाजवी असेल अशा मुदतीपेक्षां अधिक मुदतीपर्यंत रखवालींत अटकावून ठेवतां कामा नये आणि अशी मुदत, एखाद्या मॅजिस्ट्रेटनें खास हुकूम काढलेला नसल्यास, धरण्याच्या जागेपासून सदरहू मॅजिस्ट्रेटाच्या कोर्टापर्यंतच्या प्रवासास आवश्यक असेल अशी वेळ वगळून, चोवीस तासांहून अधिक असतां कामा नये.

## बाब ६.

## किरकोळ.

**३८.** सार्वजनिक वाहतुकीसाठीं असलेल्या हवाई रज्जुमार्गाच्या प्रवर्तकानें, अशा रज्जुमार्गाच्या संबंधांत, ठरविण्यांत येईल अशा अंतराअंतरानें भांडवल, जमा रकमा व वाहतूक यांविषयींचीं पत्रकें राज्य सरकारला सादर केलीं पाहिजेत.

पत्रकें.

**रस्ते, रेल्वे, ट्राम्वे व जलमार्ग यांचें संरक्षण.**

३९. हवाई रज्जुमार्गाच्या कोणत्याहि प्रवर्तकानें, अशा रज्जुमार्गाचें बांधकाम, दुरुस्ती, तो चालू ठेवण्याचें किंवा त्याची व्यवस्था ठेवण्याचें काम चालू असतांना, कोणताहि सार्वजनिक रस्ता, रेल्वे, ट्राम्वे किंवा जलमार्ग यांचें कायमचें नुकसान करतां कामा नये किंवा आवश्यक असेल त्याप्रमाणें, तात्पुरतें असेल तें खेरीजकरून, कोणताहि सार्वजनिक रस्ता, रेल्वे, ट्राम्वे किंवा जलमार्ग यावरील वाहतुकीस अडथळा करतां कामा नये किंवा तींत ढवळाढवळ करतां कामा नये.

**प्रवर्तकानें जमीन संपादन करणें.**

४०. राज्य सरकारास, जर त्यास योग्य वाटेल तर, सार्वजनिक वाहतुकीसाठीं हवाई रज्जुमार्ग बांधणें, तो चालू ठेवणें किंवा त्याची व्यवस्था करणें या कारणासाठीं कोणतीही जमीन मिळविण्याची इच्छा असलेल्या अशा रज्जुमार्गाच्या कोणत्याहि प्रवर्तकानें अर्ज केल्यावर, त्यास, ह्या अधिनियमाच्या ठरावांस पात्र राहून, जर सदरहू प्रवर्तक हा कंपनी असती तर ज्या रीतीनें व ज्या शर्तींवर अशी जमीन संपादन करतां आली असती त्याच रीतीनें व त्याच शर्तींवर ती, सन १८९४ चा जमीन घेण्याविषयीं अधिनियम याच्या ठरावांअन्वयें संपादन करण्याचा अधिकार आहे असें फर्मावण्याचा अख्त्यार आहे.

**जनावरांच्या व मालाच्या नुकसानीबद्दलच्या दाव्यांची मुदत.**

४१. कोणत्याहि इसमास, सार्वजनिक वाहतुकीसाठींच्या हवाई रज्जुमार्गावरून नेलेल्या कोणत्याहि जनावरांच्या किंवा मालाच्या संबंधांतील जादा आकार परत मिळण्याचा किंवा अशा रीतीनें नेण्यासाठीं स्वाधीन केलेल्या जनावरांचें किंवा मालाचें नुकसान, नाश किंवा खराबी झाल्याबद्दल नुकसानभरपाई मिळण्याचा, जादा आकार परत मिळण्यासाठींचा किंवा नुकसानभरपाईसाठींचा त्याचा दावा, त्यानें किंवा त्याच्या वतीनें, हवाई रज्जुमार्गावरून नेण्यासाठीं सदरहू जनावरें किंवा माल स्वाधीन केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत प्रवर्तकाकडे लेखी दाखल केला असेल तो प्रसंग खेरीजकरून, हक्क असणार नाहीं.

**विवक्षित खाजगी हवाई रज्जुमार्गांना अधिनियम लागू असणें.**

४२. (१) कलमें १, २, ४, ५, १३, १४, १५, १६, १७ व २०, कलम २१ चें पोट-कलम (१), आणि कलमें ३३ ची रकम (२) हिच्या पोट-रकमा (ब), (फ), (ग), (जे) व (के), कलमें ३६, ३७ व ३९ आणि कलम ४५ चीं पोट-कलमें (१) व (३) आणि पोट-कलम (२) च्या रकमा (अ), (ड), (इ), (ग), (ह), (जे), (म) व (ओ) हीं, कलम ३० मध्यें निर्दिष्ट केलेल्या कारणांसाठीं बांधण्यांत आलेल्या खाजगी हवाई रज्जुमार्गांनासुद्धां लागू होतील :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा कोणत्याहि रज्जुमार्गास १७ वें कलम लागू करतांना "कलम १० अन्वयें हुकूम करण्यांत आल्यानंतर" हे शब्द व आंकडे यांच्या बदला "कलम ३० पोट-कलम (१) च्या ठरावांनुसार जमीन संपादन करण्यासाठीं अधिसूचना प्रसिद्ध करण्यांत आल्यानंतर किंवा जमिनीचा तात्पुरता भोगवटा करण्यासाठीं हुकूम करण्यांत आल्यानंतर" हे शब्द, आंकडे व कंस दाखल करावे.

(२) राज्य सरकारास, प्रवर्तकानें अर्ज केल्यावर किंवा इतर रीतीनें, कलम ३० किंवा ह्या कलमाचें पोट-कलम (१) यांचे ठराव खाजगी वाहतुकीसाठींच्या कोणत्याहि हवाई रज्जुमार्गास किंवा हवाई रज्जुमार्गांच्या वर्गास लागू होतील असें जाहीर करण्याचा अधिकार आहे.

इन्स्पेक्टर, अधिकारी व नोकर हे सरकारी नोकर असणें.

४३. कलम ४ अन्वयें नेमलेले इन्स्पेक्टर व सर्व अधिकारी व नोकर हे, भारताचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या २१ व्या कलमाच्या अर्थानुसार सरकारी नोकर आहेत असें समजलें पाहिजे.

ह्या अधिनियमाअन्वयें शुद्धबुद्धीनें वागणाऱ्या इसमांस संरक्षण.

४४. या अधिनियमाअन्वयें किंवा नियमांअन्वयें शुद्धबुद्धीनें केलेल्या किंवा करावयाचा इरादा असलेल्या कोणत्याहि गोष्टीबद्दल राज्य सरकार-विरुद्ध किंवा कोणत्याहि इसमाविरुद्ध दावा किंवा इतर कामकाज चालवितां येणार नाहीं.

नियम करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

४५. (१) राज्य सरकारास, आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस पात्र राहून, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषतः आणि सदरील अधिकारांच्या सामान्यतेस बाध न येतां अशा नियमांत पुढील बाबींसाठीं तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(अ) कलम ४ अन्वयेंचे इन्स्पेक्टरांचे अधिकार ;

(ब) कलम १०, पोट-कलम (२) अन्वयें हुकूम प्रसिद्ध करण्यांत येण्यापूर्वी प्रवर्तक होण्याचा इरादा असलेल्या इसमानें अनामत रक्कम म्हणून, रक्कम देणें अथवा तारणपत्रें स्वाधीन करणें, अशा रीतीनें दिलली रक्कम गुंतविणें; अशा रीतीनें दिलेली, ठेवलेली किंवा गुंतविलेली रक्कम किंवा तारणपत्रें यांवर वेळोवेळीं येणारें व्याज किंवा डिव्हिडंड याची विल्हेवाट लावणें; प्रवर्तकास प्राप्त झालल्या कोणत्याहि जबाबदाऱ्या पार पाडण्याकडे सदरहू रक्कम किंवा तारण-पत्रें किंवा त्यावरील व्याज किंवा डिव्हिडंड यांचा विनियोग करणें; आणि सदरहू रक्कम किंवा तारणपत्रें दंडादाखल जप्त करणें, फडणें किंवा परत देणें;

(क) कलम १० अन्वयेंच्या हुकुमाच्या संबंधांत प्रवर्तक होण्याचा इरादा असलेल्या इसमांनीं ठेवावयाचे कोणत्याहि कामांचे नकाशे व सेक्शन;

(ड) पुढील गोष्टी धरून, हवाई रज्जुमार्ग सुरक्षित व कार्यक्षम रीतीनें चालू ठेवण्याच्या संबंधांत कलम १४ च्या कारणांसाठींचे नियम—

(१) रज्जुमार्गावरील बाष्पशक्तीच्या किंवा इतर कोणत्याहि यांत्रिकशक्तीच्या किंवा विद्युत्-शक्तीच्या उपयोगाचें नियमन करणें,

(२) ज्या प्रमाणभूत विस्तारांशीं व तपशिलाशीं सदरहू रज्जुमार्ग सुसंगत असला पाहिजे ते प्रमाणभूत विस्तार व तो तपशील,

(३) ज्या वेगानें वाहनें चालावयाचीं किंवा चालवावयाचीं असतील तो वेग,

(४) जो माल धोक्याचा किंवा दुर्गंधीयुक्त आहे असें समजण्यांत येत असल तो माल व असा माल हवाई रज्जुमार्गानें नेणें,

(५) हवाई रज्जुमार्गाच्या प्रत्येक वाहनांतून वाहून न्यावयाच्या उतारूंची व जनावरांची कमाल संख्या व मालाचें किमान वजन,

(६) प्रवर्तकाच्या नोकरांची वर्तणूक, आणि

(७) ज्या अटींवर व शर्तींवर प्रवर्तकानें, अडत्याच्या किंवा मालाच्या मालकाच्या वतीनें कोणत्याहि स्टेशनांत माल सांठवून ठेवला पाहिजे किंवा ठेवून घेतला पाहिज त्या अटी व शर्ती ;

(इ) ज्या शर्तींअन्वयें व ज्या रीतीनें, कलम १५, पोट-कलम (१) व कलम १६, पोट-कलम (१) यांवरून प्रवर्तकास मिळालेले अधिकार चालवितां येतील त्या शर्ती व ती रीत ;

(फ) कलम १८ व कलम २७ यांअन्वयें ठरवावयाचे कमाल व किमान दर ;

(ग) कलम २०, रकम (क) हीअन्वयें ज्या अपघातांबद्दलची नोटीस राज्य सरकारला व इन्स्पेक्टरला दिली पाहिजे ते अपघात आणि त्या कलमाअन्वयें लिहून कळविलेल्या अपघातासंबंधींचीं प्रवर्तकाच्या नोकरांचीं, पोलिस अधिकाऱ्यांचीं व मॅजिस्ट्रेटांचीं कर्तव्यें ;

(ह) सार्वजनिक वाहतुकीसाठीं हवाई रज्जुमार्ग किंवा त्याचा भाग पुन्हां चालू करण्यासाठींच्या, कलम २१, पोट-कलम (२) अन्वयेंच्या अर्जाची विल्हेवाट लावण्यासंबंधींची कार्यरीति आणि ज्या शर्तींस पात्र राहून असा रज्जुमार्ग पुन्हां चालू करतां येईल त्या शर्ती ;

(आय्) कलम २४ अन्वयें तक्रारींची तडजोड करण्यासाठीं लवादाची पद्धत ;

(जे) ह्या अधिनियमाअन्वयेंच्या फेरतपासणीचे अर्ज दफ्तरीं दाखल करण्याची, त्यांची सुनावणी करण्याची व ते निकालांत काढण्याची कार्यरीति आणि कलम २८ अन्वयें ज्या रीतीनें सल्लागार मंडळाचा सल्ला घेण्याचा अधिकार आहे ती रीत ;

(के) कलम ३८ अन्वयें ज्या अंतरानें व ज्या नमुन्यांत पत्रकें सादर केलीं पाहिजे तें अंतर व तो नमुना;

(ल) प्रवर्तकाचे हिशोब तयार करणें, सादर करणें व त्यांची तपासणी करणें ;

(म) ज्या रीतीनें या अधिनियमाअन्वयेंच्या नोटिसा बजावल्या पाहिजेत ती रीत ;

(न) ज्या रीतीनें व ज्या शर्तीअन्वयें हवाई रज्जमार्ग व रेल्वे, ट्राम्वे किंवा दुसरा हवाई रज्जुमार्ग यांच्या दरम्यान मालाच्या थ्रू बुकिंगला परवानगी देण्याचा अधिकार आहे ती रीत व त्या शर्ती;

(ओ) या अधिनियमाअन्वयें केलेले अर्ज, चौकशी, तपासणी व कामगिऱ्या यांच्या संबंधांत प्रवर्तकांवर व इतर इसमांवर आकारावयाची फी; आणि

(प) या अधिनियमाअन्वयें ठरविलेली किंवा ठरवावयाची इतर कोणतीहि बाब.

(३) या कलमाअन्वयें केलेले सर्व नियम राजपत्रांत प्रसिद्ध केले पाहिजेत.

(True translation)
J. H. DAVE,
Examiner of Books and Publications, Bombay.